अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील संशोधन
अधिकारी / सांख्यिकी अधिकारी, गट-"ब"
(राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदलीबाबत.

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग

शासन आदेश क्रमांकः इएसटी-१०१८/प्र.क्र.०२/का.१४२७

मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- १२ एप्रिल, २०१८.

संदर्भ :-१) नियोजन विभागाचे आदेश क्र.इएसटी-१०१४/प्र.क्र.१०६/का.१४२७, दि.२७/११/२०१४.
२) नियोजन विभागाचे आदेश क्र.बदली १२१७/प्र.क्र.५४/का.१४२७, दि.३१/५/२०१७.

शासन आदेश

नियोजन विभागाच्या संदर्भाधीन दिनांक २७/११/२०१४ रोजीच्या आदेशान्वये अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील संशोधन अधिकारी / सांख्यिकी अधिकारी, गट "ब" (राजपत्रित) संवर्गातील श्री.अ.दि.राजूरवार यांची सहायक जिल्हा नियोजन अधिकारी, लातूर यांची पदस्थापना करण्यात आली होती. तसेच संदर्भाधीन दिनांक ३१/५/२०१७ रोजीच्या आदेशान्वये श्रीमती प्रियंका रा.बोकील यांची सहायक जिल्हा नियोजन अधिकारी, जळगांव या पदावर बदलीने पदस्थापना करण्यात आली होती.

२. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ चे कलम ४(४) (दोन) व ४(५) मधील तरतूदीनुसार,सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने "एक विशेष बाब" म्हणून संदर्भाधीन आदेशांतील पदस्थापनेत बदल करण्यात येत असून; उक्त अधिकाऱ्यांची पदस्थापना स्तंभ क्रमांक ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे करण्यात येत आहे :-

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नांव	सध्याचे पदनाम व कार्यालय	बदलीनंतरचे पदनाम व कार्यालय	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	श्री.अ.दि.राजूरवार	सहायक जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा- लातूर	सहायक जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा- परभणी.	रिक्त पदावर. (विनंतीनुसार)
२	श्रीमती प्रियंका रा. बोकील	सहायक जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा- जळगांव (दि.३१/५/२०१७ रोजीच्या बदलीच्या आदेशान्वये दिलेली पदस्थापना)	सहायक जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा- लातूर.	श्री.अ.दि.राजूरवार, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा- लातूर यांच्या बदलीमुळे रिक्त होणाऱ्या पदावर. (विनंतीनुसार)

३. जिल्हाधिकारी, लातूर व जिल्हाधिकारी, जळगांव यांनी संबंधित सहायक जिल्हा नियोजन अधिकारी यांच्या पदाचा कार्यभार अन्य अधिकाऱ्याकडे सोपवून त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच कार्यमुक्तीनंतर संबंधित अधिकारी यांनी बदली केलेल्या पदावर तात्काळ रुजू व्हावे. संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, आदेशाच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या कालावधीत संबंधित अधिकारी

रुजू न झाल्यास, त्याबाबत शासनास अवगत करण्यात यावे; जेणेकरुन संबंधिताविरुद्ध शिस्तभंगविषयक कार्यवाही त्वरीत करणे शक्य होईल.

४. नियोजन विभागाच्या या आदेशान्वये बदली झालेले संबंधित अधिकारी बदलीच्या कार्यालयात रुजू झाल्यानंतर त्यांनी तात्काळ संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्याशी संपर्क साधून ई-प्रोफाईल अद्ययावत करण्याची कार्यवाही सात दिवसांच्या आत करावी. अद्ययावत केलेले ई-प्रोफाईल संबंधित कार्यालयाने संबंधित अधिकाऱ्याच्या त्या महिन्याच्या वेतन देयकासोबत कोषागार कार्यालयास सादर केल्याशिवाय त्यांचे वेतन देयक कोषागार कार्यालयाने पारित करु नये. तसेच, अद्ययावत ई-प्रोफाईलच्या प्रती संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय व शासनास पाठविण्यात याव्यात. ई-प्रोफाईल अद्ययावत करण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखांची राहील.

५. संबंधित कार्यालयप्रमुखांनी बदली करण्यात आलेल्या अधिकाऱ्यास कार्यमुक्त केल्याबाबतच्या व रुजू करुन घेतल्याच्या आदेशाची प्रत या विभागास अग्रेषित करावी.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१११२०३३८९०१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Priyanka Ranjan Chhapwale

Digitally signed by Priyanka Ranjan Chhapwale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2295c5c50b6a2aa03b2654fd2f5f69a709a20ae44359c483f3e1b0d4450728d0, cn=Priyanka Ranjan Chhapwale
Date: 2018.04.12 12:28:21 +05'30'

(प्रियांका रं. छापवाले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई / नागपूर.
२. मा.मुख्यमंत्री /मा.मंत्री (नियोजन)/मा.राज्यमंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक/औरंगाबाद.
४. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
५. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव / लातूर / परभणी.
६. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
७. सहसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद/नाशिक.
८. उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद/नाशिक.
९. उपसंचालक (प्रशासन), अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
१०. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव / लातूर / परभणी.
११. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, जळगांव / लातूर / परभणी.
१२. अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.
१३. संबंधित अधिकारी (अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत).
१४. निवड नस्ती.